# खिसमस एक अभिनव प्रथा

खिसमसच्या दिवसात अमेरिकेत सगळीकडे रोषणाई आणि आनंद असतो. पण सर्वात जास्त आनंद लहान मुलांच्या चेहेऱ्यावर दिसतो कारण त्यांचा सॅन्ता क्लॉजवर पूर्ण विश्वास असतो आणि सॅन्टा त्यांना खिसमसच्या दिवशी छान छान खेळ व कपडेआणून देईल याची त्यांना खात्री असते. पण आई व वडील सारखे सांगत असतात की " पहा बरे, नीट वाग, रडू नको, हे– करु नको कारण सॅन्टाला ते आवडले नाही तर तो तुला काहीच गंमत देणार नाही."

या वर्षी माझी नात माया सप्टेंबरमध्ये चार वर्षाची झाली व तिच्या आईला (माझी मुलगी शरयु) मार्चमहिन्यामधे जुळे झाले म्हणून मी व माझी पत्नी रोहिणी तिला मदत करण्यासाठी तिच्या घरीच रहात होतो. खिसमसच्या एक महिना आधी शरयू एक १०–१२ इंच उंचीचा 'एल्फ ऑन द शेल्फ' एका दुकानातून विकत घेऊन आली आणि मायाच्या नकळत तिने तो एल्फ एका उंच जागी ठेवला व मायाला तो सकाळी दाखवून सांगितले की "तो एल्फ सॅन्टाने आपल्याकडे पाठविला आहे. तो रोज तुला पहात असतो व तू कशी वागतेस ते पाहून रात्र झाल्यावर सॅन्टाकडे जातो व त्याला सांगतो की तू शहाण्यासारखी होतीस की नाही. परत आल्यावर तो दररोज वेगळ्या ठिकाणी बसतो" (एल्फ ऑन द शेल्फ बरोबर मुलांना त्याबद्दल काय सांगायचे त्याचे पुस्तकही येते). रोज रात्री माया झोपल्यावर (देवाची प्रार्थना म्हणून) शरयु व समीर त्या एल्फची जागा बदलायचे. त्याचे नाव फ्रेडी ठेवले होते. सकाळी माया उठल्यावर आधी फ्रेडी कुठे आहे ते शोधायची व आम्हा सगळ्यांना खूप उत्साहाने सांगायची. तिला सांगून ठेवले होते की "तो नेहमी कुठेतरी उंच जागेवर बसतो. लहान मुलाचा हात लागला तर त्याची मायावी शक्ती नाहीशी होते व मग तो रोज सॅन्टाला भेटायला जाऊ शकणार नाही." हा कार्यक्रम रोज चालला होता व माया गुणी मुलीसारखी वागत होती.

पाहता पाहता डिसेंबरची २४ तारीख आली व त्या दिवशी मायाचा चेहेरा थोडासा हिरमुसला वाटला म्हणून मी तिला कारण विचारले. तिने मला सांगितले की खिसमसच्या दिवशी फ्रेडी रात्री सॅन्टाकडे गेल्यानंतर वर्षभर परत येणार नव्हता यामुळे तिला खूप वाईट वाटत होते व तिच्या डोळ्यात अश्रु आले. अर्थात तिला पाहून मला व माझ्या पत्नीलाही खूप वाईट वाटायला लागले. मायाला पाहून मला स्वर्गीय कवी भा. रा. तांबे यांची कविता आठवली त्याचे एक कडवे असे:

गायी पाण्यावर काय म्हणुनी आल्या?  
का ग गंगा यमुनाही या मिळाल्या  
उभय पितरांच्या चित्त चोरटीला  
कोण माझ्या बोलले गोरटीला?

यावर काय उपाय करायचा याची आम्ही आपसात चर्चा करुन मायाला सांगितले की "सॅन्टाने फ्रेडीला सांगितले आहे की उत्तर ध्रुवावर हिवाळ्यात खूप थंडी असते यासाठी तू मायाच्या घरीच रहा." आता तो रात्रीही इथेच राहणार असल्याने रोज जागा मात्र बदलणार नाही हे ऐकून मायाचे समाधान झाले व तिच्या चेहेऱ्यावर परत स्मित आले व आमच्याही.

**कर्नल नारायण देशमुख, सेयर, पेनसिल्व्हेनिया**